# अपेक्षांचं असह्य ओझं

*जनतेच्या आशा अवास्तविक पातळीला नेल्यावर आता मोदींना संघाच्या बहुसंख्याकवादी कार्यक्रमावर भर द्यावा लागणार आहे.*

उत्तर प्रदेशातील निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला (भाजप) मिळालेला नेत्रदीपक विजय म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदींचं वैयक्तिक यश आहे, असं बोललं जातं आहे. या घटनेमुळे चांगल्या भविष्याविषयीच्या गरिबांच्या आशा वाढल्या आहेत. या सरकारच्या आर्थिक धोरणांची दिशा पाहता, रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करताना मोठी आव्हानं उभी राहणार आहेत. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (रा. स्व. संघ) अतिराष्ट्रवादी हिंदू बहुसंख्याकवादी कार्यक्रमाचा आधार घेण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय मोदींकडे उरणार नाही. २०१९ सालच्या निवडणुकांनंतर आपण 'दुसऱ्या भारतीय प्रजासत्ताका'चे 'सर्वोच्च नेते' म्हणून उदयाला येऊ, असा विश्वास मोदींना वाटतो आहे, याचं मूळ कारण त्यांच्या राजकीय विरोधकांच्या विखुरलेपणामध्ये आहे. मोदींच्या राजकीय विरोधकांना एकत्र येणं अवघड जाणार आहे, त्यामुळे मोदींच्या वर्चस्वशाली प्रभावाला प्रतिकार करण्यासाठी कोणी पुढं येण्याची शक्यता दित नाही.

उत्तर प्रदेश हे देशातलं सर्वाधिक लोकसंख्या असलेलं राज्य आहे आणि दर सहा भारतीयांपैकी एक जण या राज्यात राहाणारा असतो. अशा राज्यातील विधानसभेच्या ८० टक्के जागांवर भाजपचे उमेदवार विजयी झाले आहेत. उत्तर प्रदेशातील अनेक मतदारांच्या दृष्टीनं मोदी हे चांगल्या भविष्याच्या आशेचं प्रतिनिधित्व करतात. ऊर्जा असलेले, भ्रष्ट न होणारे व स्वार्थी लाभ करून देण्यासाठी स्वतःचं कुटुंब नसलेले नेते अशी त्यांची प्रतिमा बहुसंख्य गरिबांना भावली. बांग्लादेशनिर्मितीनंतर १९७१ साली इंदिरा गांधी लोकप्रियतेच्या शिखरावर पोचल्या होत्या, त्यानंतर पहिल्यांदाच भारतीय राज्यव्यवस्थेवर पूर्ण वर्चस्व प्रस्थापित करणारा नेता मोदींच्या रूपात वावरतो आहे. मोदींनी या निवडणुकांमध्ये ज्या सक्रियतेनं आणि ऊर्जेनं प्रचार केला तसा प्रचार कोणत्याही पंतप्रधानानं राज्य पातळीवरील निवडणुकांसाठी केलेला नाही. उत्तर प्रदेशातील एकपंचमांश लोकसंख्या मुस्लिमांची आहे, पण भाजपनं एकही मुस्लीम उमेदवार दिलेला नव्हता. अशा पद्धतीनं एखाद्या राजकीय पक्षानं मुस्लिमांकडे पूर्णपणे व उद्धटपणे दुर्लक्ष करण्याचा प्रकारही पहिल्यांदाच घडतो आहे. यातून मुस्लिमांना देण्यात आलेला संदेश स्पष्ट आहे: तुम्ही तसंही भाजपला मत देणार नाही, मग आम्ही एखादा मुस्लीम उमेदवार तरी का द्यावा?

मोदी व त्यांचे विश्वासू सहकारी भाजप-अध्यक्ष अमित शाह यांनी या निवडणुकांचं सूक्ष्म पातळीवर नियोजन केलं. मताधिक्याच्या निवडणूक व्यवस्थेमध्ये विजेत्याला सर्व काही मिळतं आणि पराभूत सर्व काही गमावून बसतो, या प्रक्रियेतील अस्थिरता या दोघांना सखोलपणे समजलेली आहे. उत्तराखंडमधील भाजपचा विजयही उत्तर प्रदेशाइतकाच निर्णायक होता. उत्तराखंडातील राज्यव्यवस्था द्विध्रुवात्मक आहे. उत्तर प्रदेशाच्या विभाजनाद्वारे २००० साली उत्तराखंड हे वेगळं राज्य स्थापन झालं तेव्हापासून इथं एक-आड-एक पद्धतीनं काँग्रेस व भाजप यांची सरकारं सत्तेत आली आहेत. विधानसभा निवडणुका झालेल्या राज्यांमधील परिस्थिती एकमेकांपासून अनेक अर्थांनी भिन्न आहे पण प्रस्थापित सरकारांचा सर्व ठिकाणी पाडाव झाला हा समान घटक या निवडणुकांमध्ये दिसून आला. मणिपूरमध्ये काँग्रेसचे मुख्यमंत्री ओक्राम इबोबी सिंग हे सलग तिसऱ्यांदा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करत होते, तिथं प्रस्थापितविरोधी भावनाही अत्यल्प स्वरूपात होती. मणिपूरसोबतच गोव्यातही काँग्रेसच्या नेतृत्वानं (किंवा त्यांच्या उरल्यासुरल्या नेतृत्वफळीनं) यशाच्या हातातून पराभव हिसकावून आणला. गतकाळामध्ये काँग्रेसकडूनच भाजपनं विविध क्लृप्त्या व

वाटाघाटींची कौशल्यं आत्मसात केली आणि आता या पद्धतींमध्ये काँग्रेसपेक्षा भाजपची सरशी झालेली या दोन राज्यांत दिसली.

पंजाबमध्ये शिरोमणी अकाली दल व भाजप यांच्या आघाडीनं दहा वर्षं सत्ताकाळ उपभोगलेला असल्यानं आताच्या निवडणुकीत त्यांचा पराभव होण्याचीच शक्यता होती, आणि तसा पराभव झालाही. पण काही जास्तीच्या जागा मिळवलेल्या आम आदमी पक्षापेक्षा (आप) अकाली–भाजप आघाडीला मतांचा वाटा जास्त मिळाला. पंजाबमध्ये पहिल्यांदाच निवडणुकीत उतरलेल्या 'आप'साठी ही निराशाजनक कामगिरी होती. गेल्या दोन निवडणुकांमध्ये अकाली–भाजप आघाडीला मतं दिलेला बराच मोठा मतदारवर्ग 'आप'पेक्षा काँग्रेसच्या पाठीमागे उभा राहिला. 'कट्टरतावाद्यां'शी असलेली कथित जवळीक, दिल्लीकेंद्रीतता व अननुभव या बाबी 'आप'च्या विरोधात गेल्याचं दिसलं. विशेष म्हणजे नोटबंदी किंवा निश्चलनीकरणाच्या निर्णयाचा पंजाबमधील मतदारांवर फारसा परिणाम झाल्याचं दिसलं नाही. स्वतःहून ओढवून घेतलेल्या या आर्थिक आपत्तीला राजकीय संपत्तीमध्ये रूपांतरित करण्यात मोदींना उत्तर प्रदेशात मात्र यश आलं. असं कसं काय घडलं?

आपल्याकडून चुका होऊ शकतात पण आपल्या हेतूवर शंका घेता येणार नाही, असं मोदींनी उत्तर प्रदेशामध्ये प्रचारमोहिमेतील शेवटच्या भाषणात म्हटलं होतं. निश्चलनीकरणाचा काळ्या अर्थव्यवस्थेवर अतिशय अल्प स्वरूपाचा परिणाम होईल किंवा काहीच परिणाम होणार नाही, आणि दहशतवाद्यांकडून तयार केल्या जाणाऱ्या बनावट चलनालाही यातून आळा बसणार नाही. रोकड व्यवहारांवर कमी अवलंबून राहणारा समाज बनण्यासाठी भारताला आवश्यक तेवढा कालावधी लागेलच. पण मोदींनी संदेशनाच्या कौशल्यामध्ये त्यांच्या टीकाकारांवर मात केली. निश्चलनीकरणाच्या विरोधकांसाठी हा क्षण नवीनच धक्का देणारा होता. भावनेला हात घालण्याचं पंतप्रधान मोदींचं कसब यावेळी सर्वोच्च पातळीवर पोचलेलं दिसलं. गरीब, मध्यमवर्गीय आणि काही श्रीमंत लोकांनाही बँकांसमोर एकाच रांगेत उभं करणारा समतावादी निर्णय म्हणून निश्चलनीकरणाचा उल्लेख करण्यात आला. या निर्णयामुळे अर्थव्यवस्थेमध्ये अस्थिरता निर्माण होईल, एवढाच मुद्दा अधोरेखित करणाऱ्या आपल्यापैकी अनेकांना या निर्णयामागील आर्थिक प्रतीकात्मकता कळलीच नाही. गरिबांचं जीवन कायम बिकटच राहिलेलं आहे, पण मोदींनी अशी मांडणी केली, की आता श्रीमंतांनाही गरिबांच्या दुरवस्थेतील काही वाटा उचलावा लागतो आहे आणि सक्तीनं त्यांना हा अनुभव घ्यावा लागतो आहे. उत्तर प्रदेशासारख्या आर्थिकदृष्ट्या मागास राज्यात ही क्लृप्ती योग्य पद्धतीनं परिणामकारक ठरली, पण संपन्न शेती असलेल्या पंजाबमध्ये याची मोहिनी पडली नाही.

निश्चलनीकरणाचा फटका श्रीमंतांपेक्षा गरिबांना जास्त बसला, हे निश्चित. पण हा अभूतपूर्व निर्णय आर्थिक वंचितांची मदत करण्याच्या 'हेतू'नं घेण्यात आलेला आहे, अशी प्रेषितसदृश मांडणी करण्याची ऊर्जा मोदींच्यात होती, ही बाब या निर्णयाच्या टीकाकारांनी (इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकलीमध्ये लेखन केलेल्यांनीही) ध्यानात घेतली नाही. 'भांडवलवादी' मोदींचे हुकुमशाही मार्ग आणि 'समाजवादी' इंदिरा गांधींची कार्यपद्धती यांच्यातील साम्य अधोरेखित करण्यावर मोठा भर दिला गेला. पण या दोन नेतृत्वांच्या कार्यशैलीत काही महत्त्वाचे भेदही आहेत. 'गरिबी हटाओ' या घोषणेनं काँग्रेस पक्षातील 'एकमेव पुरुषा'च्या लोकप्रियतेला पुष्टी दिली. त्यापूर्वी इंदिरा गांधींनी त्यांच्या पक्षात दोनदा फूट पाडली होती, देशाच्या बहुतांश बँकिंग व्यवस्थेचं राष्ट्रीयीकरण केलं होतं आणि संस्थानिकांना दिलं जाणारं अर्थसाहाय्य बंद केलं होतं. सध्याच्या पंतप्रधानांनी गरिबी निर्मूलनाऐवजी तुलनेनं चांगल्या आयुष्याच्या संधी उपलब्ध करून देण्यासंबंधीची वक्तव्यं करायला सुरुवात केली आहे. ऐंशी टक्के भारतीय लोकसंख्येची तथाकथित हिंदू ओळख आणि रा. स्व. संघ व भाजप यांचा राष्ट्रवादाचा कार्यक्रम यांच्यात सांधा जोडण्यात आला, त्याचप्रमाणे संघ परिवाराच्या हिंदुत्वाच्या कार्यक्रमाला 'विकासा'शी जोडण्यात आलं. गरिबांना 'अर्थसाहाय्य' पुरवण्याऐवजी नोकऱ्या देण्याची आपली इच्छा आहे, असं मोदी म्हणतात. पण आधीच्या सरकारनं सुरू केलेल्या कल्याणकारी योजनांची (स्वयंपाकाचा गॅस सवलतीत देण्यापासून ते शून्य रकमेमध्ये बँक खातं उघडण्यापर्यंतच्या योजना) अंमलबजावणी सुधारण्याचेही प्रयत्न त्यांनी सुरू केले आहेत. यातही पुन्हा आदर्श घोषणांमध्ये फरक दिसून येतो.

या देशातील व इतरत्रही भांडवलशाहीच्या रचनात्मक तर्कपद्धतीमुळे विषमता व बेरोजगारीसोबतची प्रगती तीव्रतेनं

वाढत आहेत. चलनवाढीचा दबाव वाढतो आहे आणि भांडवलाच्या जागी श्रम आणून वृद्धी करण्याच्या तुलनेत रोजगारनिर्मिती करणं खाजगी क्षेत्राला अवघड जातं आहे. अशा वेळी मोदींना ‘अच्छे दिन’ आणण्याचं आश्वासन पूर्ण करणं अधिकाधिक अवघड बनणार आहे. हे आश्वासन अवास्तविक आहे याची जाणीव अधिकाधिक लोकांना होत जाईल, त्यानुसार मोदी त्यांच्या पक्षाच्या मूळ भूमिकेत– म्हणजे आमच्यासोबत किंवा आमच्याविरोधात अशा ध्रुवीकरणात शिरतील. धमकावणीद्वारे मुक्त अभिव्यक्ती दडपण्याचं समर्थन राष्ट्रीय/राष्ट्रविरोधी अशा संज्ञांमध्ये केलं जाईल. लोकप्रियता मिळवण्यासाठी ते समान नागरी कायदा (तिहेरी तलाकच्या दमनापासून मुस्लीम महिलांची सुटका करण्याच्या नावाखाली) अमलात आणू पाहतील आणि विधिमंडळांमध्ये महिलांना जागा आरक्षित केल्या जातील. २०१९च्या सर्वसाधारण निवडणुकांनंतर राज्यसभेतही भाजपला बहुमत मिळण्याची चिन्हं दिसत आहेत आणि राज्यघटनेच्या प्रस्तावनेतून धर्मनिरपेक्षता व समाजवाद हे शब्द गाळण्यासाठीचे प्रयत्न सुरू झाले असण्याची शक्यता आहे.

उत्तर प्रदेशातील निकालाद्वारे जातिआधारित अस्मितेच्या राजकारणाचा पराभव झाला आहे, अशी मांडणी भाजपचे समर्थक जोरकसपणे करत आहेत. हे सुलभीकरण आहे. अनेक बिगरजाटव दलित बहुजन समाज पक्षाच्या (बसप) पाठीशी उभे राहिलेले नाहीत. इतर मागासवर्गीयांमधील (ओबीसी : अदर बॅकवर्ड क्लास) यादवेतरांनी सांगितलं की समाजवादी पक्षाचं सरकार यादवांच्या बाजूनं पक्षपाती होतं. बसप आणि समाजवादी पक्षाच्या पारंपरिक समर्थकांनी त्यांच्या पक्षांना दूर सारलं नाही, पण भाजपनं काळजीपूर्वक आखलेली जातीय गणितं परिणामकारक ठरली. लहान जातिआधारित गटांसोबत आघाडी करण्यात भाजपला यश आलं. बसपच्या अध्यक्षा मायावती यांचं नजीकचं राजकीय भवितव्य अंधारलेलं दिसतं आहे. त्यांना त्यांची राज्यसभेतील जागाही टिकवून ठेवणं बहुधा शक्य होणार नाही. उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनाही त्यांचा ढासळलेला पाया पुन्हा तयार करण्यासाठी दीर्घकाळ प्रयत्न करावे लागतील, शिवाय समाजवादी पक्षातील कौटुंबिक यादवीवरही उपाय करावा लागेल.

काँग्रेस उपाध्यक्ष राहुल गांधी यांच्याविषयी फारसं न बोलणंच श्रेयस्कर ठरेल. भारतातील वर्चस्वशाली पक्षाची जागा आपल्याकडून भाजपनं हिसकावली आहे, त्यातून आपला अपमानास्पद पराभव झाला आहे, याची कारणं काय असतील, याचा शोध घेण्याचीही त्यांना इच्छा नसल्याचं दिसतं आहे. पंजाबमधील काँग्रेसच्या यशाचं काहीही श्रेय राहुल गांधींना देता येणार नाही. काँग्रेस या सगळ्यातून तरेल का? गांधी–नेहरू घराण्याचा टीकेपासून बचाव करणारा कंपू दूर होईल का? तळपातळीवरील मोहीम शून्यातून उभी राहील का? या प्रश्नांची उत्तरं शंकास्पदच वाटतात. पण अधिक वेगानं विस्मृतीत जायचं नसेल तर काँग्रेसला या मुद्द्यांवर काम करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. पण हे एवढंच नाही! काँग्रेसमुक्त भारताच्या बाता केल्या जात असल्या तरी भाजपला काँग्रेस व राहुल यांच्या रूपात मुख्य ‘इतर’ असणंही निकडीचं आहे.

भाजपच्या राजकीय विरोधकांचं भवितव्य काय असेल? पंजाबमधील वाईट कामगिरी आणि गोव्यात उपस्थिती नोंदवण्यातही आलेलं अपयश या पार्श्वभूमीवर ‘आप’ला दिल्लीतील महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांमध्ये कठोर परीक्षेला सामोरं जावं लागेल. या निवडणुकीसाठी भाजपनं एकाही विद्यमान नगरसेवकाला उमेदवारी दिलेली नाही. अखिल भारतीय पातळीवरच्या आपल्या आकांक्षांचा पुनर्विचार ‘आप’चे नेते अरविंद केजरीवाल यांनी करायला हवा आणि या अवाजवी आकांक्षांपायी दुरावलेल्या आधीच्या सहकाऱ्यांसोबत संवादाचे पूल पुन्हा बांधायला हवेत. पश्चिम बंगालमध्ये डाव्यांची जागा ताब्यात घेऊन मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचा मुख्य विरोधक म्हणून स्वतःचं स्थान निर्माण करण्याचा तीव्र प्रयत्न भाजप करेल. घृणास्पद राजकीय हिंसाचाराची पुढील युद्धभूमी पश्चिम बंगाल असण्याची शक्यता आहे, आणि हा हिंसाचार सांप्रदायिक वळण घेण्याचीही मोठी संभाव्यता आहे. भाजपच्या विरोधात असलेल्या सर्व राजकीय शक्ती सहजपणे एकत्र येऊन बिहारप्रमाणे ‘महागठबंधन’ तयार करतील, असं मानणं भाबडेपणाचं ठरेल. समाजवादी पक्ष व बसप, डावे आणि तृणमूल काँग्रेस, अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम व द्रविड मुन्नेत्र कळघम या सर्वांना त्यांचे मतभेद विसरून समान राजकीय प्रतिस्पर्ध्याविरोधात एकत्र येणं सोपं जाणार नाही. भाजपविरोधी आघाडीचं नेतृत्व सर्वसहमतीनं बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्याकडे

येऊ शकतं. निश्चलनीकरणावर टीका करताना कुमार यांनी मौनाचाच वापर जास्त केला, यावरून तेही त्यांचं नशीब आजमावण्याच्या तयारीत असावेत असं दिसतं.

या निराशाजनक परिस्थितीला दूर सारण्याचं मोठं आव्हान मोदीविरोधकांसमोर आहे. गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगढ व राजस्थान इथल्या आगामी निवडणुकांमध्ये भाजपची कामगिरी चांगलीच होईल, अशी शक्यता आहे. हिंदुत्व आणि चांगल्या भविष्याविषयीची आपली स्वप्नं वारंवार पुढं ठेवून मोदी त्यांच्या अपूर्ण आश्वासनांपासून जनतेचं लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत आहेत. तरीही त्यांच्या विरोधकांना एकत्र येण्यात अनेक अडचणींना सामोरं जावं लागत आहे, ही बाब पुन्हा मोदींच्या पथ्यावरच पडते आहे. ●

# कामगारांचा पथदर्शी संघर्ष

*‘मारुती सुझुकी’चं दडपशाही करणारं व्यवस्थापन आणि त्यांच्याशी संगनमत केलेली राज्यसंस्था यांना या कंपनीतील कामगार शौर्यानं सामोरे गेले आहेत.*

‘मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड’ या कंपनीतील कामगार आणि पर्यवेक्षक यांच्यामध्ये कंत्राटी पद्धतीवरून झालेल्या संघर्षामध्ये २०१२ साली मनुष्यबळ विभागाच्या महाव्यवस्थापकाचा मृत्यू ओढवला होता. या कंपनीच्या मानेसर इथल्या कारखान्यात घडलेल्या या घटनेसंबंधी न्यायालयात खटला सुरू झाल्यावर कामगारांच्या मूळ समस्येवरून लक्ष बाजूला गेलं. अतिशय खालावलेल्या कार्यपरिस्थितीविरोधात कामगार निदर्शनं करत होते आणि आपल्या निवडीनुसार संघटना बनवण्याचा अधिकार मिळावा अशीही त्यांची मागणी होती. व्यवस्थापकाच्या मृत्यूसंबंधीच्या खटल्यात १० मार्च रोजी गुरुग्राम जिल्हा न्यायालयानं ११७ कामगारांना दोषमुक्त केलं, तर इतर ३१ जणांना विविध आरोपांखाली दोषी ठरवलं. खून, खुनाचा प्रयत्न, दंगा घडवणं आणि खाजगी मालमत्तेचा विध्वंस करणं, अशा आरोपांखाली त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला. या दोषींना १८ मार्च रोजी शिक्षा सुनावण्यात आली (‘इपीडब्ल्यू’चा अंक याच दिवशी प्रसिद्ध होत असल्यानं शिक्षेचा तपशील हे संपादकीय लिहिलं जाईपर्यंत उपलब्ध झालेला नव्हता). मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड ही भारतातील चारचाकी गाड्यांचं सर्वाधिक उत्पादन करणारी कंपनी आहे. या शक्तिशाली बहुराष्ट्रीय कंपनीच्या विरोधात आणि या कंपनीला साथ देणाऱ्या राज्यसंस्थेविरोधात लढणाऱ्या कामगारांचं नेतृत्व या कंपनीतील कामगार संघटनेनं केलं होतं. न्यायालयीन खटल्यात दोषी ठरवण्यात आलेल्यांमध्ये या संघटनेतील सर्व समितीसदस्यांचा समावेश आहे.

कामगार आणि व्यवस्थापन यांच्यातील संघर्षाची सुरुवात २०११ साली झाली. त्या वेळी संघटना स्थापण्याचा प्रयत्न करणाऱ्या कामगारांविरुद्ध व्यवस्थापनानं दडपशाहीचा बडगा उचलला आणि अनेकांना कामावरून काढून टाकलं. संघटनाबांधणीचा आपला अंगभूत अधिकार मागत असलेले कामगार जणू काही कंपनीला उद्ध्वस्त करायला आलेले शत्रू आहेत, अशी वागणूक व्यवस्थापनानं त्यांना दिली. त्याच वर्षी कंपनीतील कार्यपरिस्थिती अतिशय ढासळल्याचा निषेध करत कामगारांनी तीन वेळा संप केला. कोणतीही चर्चा अथवा वाटाघाटी करण्यापूर्वी संघटनेनं आधी कल्याण व तक्रार समित्यांची स्थापना करावी, अशी मागणी व्यवस्थापनानं केली. संघटनेची मुख्य भूमिका मवाळ करण्याचा हा प्रयत्न असल्याचं कामगारांचं म्हणणं होतं. स्थानिक पोलीस स्थानकांमध्ये संघटनेच्या नेत्यांविरोधात व्यवस्थापनानं खोट्या तक्रारी दाखल केल्या. कंपनीच्या या कारखान्यातून दर ५० सेकंदांना नवीन कार तयार होऊन बाहेर पडते. या प्रक्रियेमध्ये एकाच स्वरूपाचं काम करणाऱ्यांपैकी कायमस्वरूपी कामगारांपेक्षा कंत्राटी कामगारांना अतिशय कमी वेतन दिलं जात होतं (अशा कामगारांनाही कायमस्वरूपी तत्त्वावर घ्यावं, अशी कामगार संघटनेची एक मागणी होती). सर्व कामगारांना उत्पादनाची लक्ष्यं गाठण्यासाठी शारीरिक व मानसिक तणावालाही सामोरं

जावं लागत होतं. या प्रकरणात राज्ययंत्रणेनं निःपक्षपातीपणाचा आवही आणला नाही. विशेषतः स्थानिक पोलीस तर उघडच कंपनी व्यवस्थापनाच्या बाजूनं होते.

१८ जुलै २०१२ रोजी घडलेल्या घटनेबाबत साक्षीदारांसमोर दोषींची ओळख पटवण्याची पद्धती त्रुटींनी भरलेली होती व त्यात अनेक घोळ झालेले आहेत, असा युक्तिवाद बचावपक्षाचे वकील जिल्हा न्यायालयात सातत्यानं करत होते. 'शस्त्रं' नंतर घटनास्थळी ठेवण्यात आली, पुराव्यामध्ये पोलिसांनी फेरफार केला आणि तपास अधिकाऱ्यानं बळकट पुराव्याऐवजी तोंडी जबानीवर अवलंबून राहायचा मार्ग पत्करला, असाही युक्तिवाद कामगार संघटनेच्या वकिलांनी केला. तुरुंगवासात असलेल्या कामगारांच्या जामिनाच्या याचिका फेटाळताना २०१३ साली पंजाब व हरयाणा उच्च न्यायालयानं असं निरीक्षण नोंदवलं की कामगारांच्या संदर्भातील अशांततेमुळे या देशात परदेशी गुंतवणूकदार गुंतवणूक करण्याची शक्यता कमी होते. कंपनीच्या अध्यक्षांचं विधान याहून विशेष होतं. संघटनाबांधणीच्या प्रयत्नांना प्रतिसाद देताना ते म्हणाले की, कामगारांची कोणतीही 'महत्त्वाची मागणी' नाही, आणि कोणतीही 'तडजोड' याबाबतीत केली जाणार नाही. भारतातील कामगार चळवळ अतिशय कमजोर अवस्थेत असताना मारुती सुझुकी कामगार संघटनेच्या नेतृत्वाखालील हा लढा विलक्षण ठरतो. आधीची सरकारं आणि विद्यमान राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार यांचा मुख्य भर 'श्रम सुधारणां'वर असतो, यातून परदेशी आणि देशी गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल अशी आशा त्यांना वाटते. या पार्श्वभूमीवरही मानेसरमधील कामगारांचा लढा महत्त्वाचा ठरतो. देशाच्या 'प्रगती'मध्ये कामगार कायद्यांचा अडथळा होत असल्याचा ठपका भारतीय उद्योगविश्वाकडून वारंवार ठेवला जातो. परंतु हे कायदे अंमलात येण्याऐवजी अनेकदा मोडलेच जात असतात, त्यामुळंच कंत्राटी रोजगार आता सर्रास आढळतो, ही बाब उद्योगपतींकडून सांगितली जात नाही. उद्योगविश्व आणि राज्यसंस्था यांच्या या प्रवृत्तीच्या संदर्भात मारुती-सुझुकी कंपनीतील कामगारांच्या मागण्या व त्यांचं आंदोलन यांकडे गांभीर्यानं पाहायला हवं. कामाचे तास न्याय्य स्वरूपात असावेत आणि त्यानुसार वाजवी वेतन मिळावं, अशी मागणी करणारे कामगार गुंतवणुकीला अडथळा ठरत असल्याचा आरोप करता येणार नाही. पण 'सुधारणां'च्या नावाखाली कामगार कायद्यांमध्ये दुरुस्त्या केल्यानं कामगारांचे अधिकार व कल्याणकारी पद्धती यांच्यावर एकतर्फी मर्यादा आणल्यासारखं होतं. उत्क्रांतावस्थेतील प्रवाह आणि प्रक्रियांना सामोरं जाताना काहीच बदल होऊ नयेत, असा याचा अर्थ नाही. पण उत्पादन 'सुरळीत' राहावं यासाठी असंघटित, अतिकार्यव्याप्त व कमी वेतनावर काम करणाऱ्या कामगारांना झळ सहन करावी लागणंही योग्य नाही. मारुती-सुझुकी इंडिया लिमिटेड या कंपनीच्या कागदोपत्री नोंदींनुसार, २०१३-१४ साली ६,५७८ कामगारांना हंगामी तत्त्वावर रोजगार देण्यात आला होता आणि २०१६ साली अशा कामगारांची संख्या १०,६२६ इतकी होती, असं वृत्त 'ब्लूमबर्ग'नं दिलेलं आहे. सध्या सर्व बाजूंनी ढासळलेल्या भारतातील कामगार चळवळीनं या प्रश्नांवर तोडगे शोधायला हवेत.

शिवाय, आता दोषमुक्त झालेल्या ११७ कामगारांना चार वर्षं तुरुंगात कोंडून ठेवण्यात आलं होतं, हा अन्यायकारक इतिहासाचा आणखी एक भाग. या कामगारांवर करण्यात आलेला एकही आरोप सिद्ध करता आला नाही. केवळ सतावण्याच्या हेतूनं आपल्या सदस्यांवर खोटे फौजदारी खटले लादण्यात येत आहेत, हा कामगार संघटनेचा आरोप सत्य असल्याचं यातून दिसतं. विशेष म्हणजे २०११पासून-खासकरून गेल्या चार वर्षांमध्ये काही चढउतार वगळता मारुती-सुझुकी कामगार संघटनेच्या सर्व कामगारांनी लक्षणीय एकजूट दाखवली आहे. ओखला-फरीदाबाद-नोएडा-गुडगाव-मानेसर या औद्योगिक पट्ट्यातील इतर कामगारांसोबतच आपल्या सहाय्यजाळ्यामध्ये सहभागी असलेले आजूबाजूचे व्यापक ग्रामसमुदाय, नागरी समाज गट व माध्यमांमधील काही घटक यांच्यापर्यंत आपला आवाज पोचवण्याची असामान्य क्षमता मारुती-सुझुकी कंपनीतील कामगारांनी दाखवली आहे.

चैतन्यशाली लढा आणि इतर घटकांशी संवाद साधण्याची क्षमता यांद्वारे मारुती-सुझुकी कामगार संघटनेनं कामगारांची एकजूट व स्पष्ट दृष्टी यांतून काय घडू शकतं याचा दाखला घालून दिला आहे. कामगारांचे अधिकार दडपण्यासाठी राज्यसंस्था व उद्योगविश्व भविष्यात एकत्र येतील, अशी शक्यता दिसते आहे. या पार्श्वभूमीवर मारुती-सुझुकी कामगार संघटना यांचा लढा पथदर्शी ठरला आहे.●

# प्रगतीचे ‘अंधा’ज

*भारताची अर्थव्यवस्था ढासळते आहे, पण ‘पर्यायी तथ्यां’च्या आधारे निश्चलनीकरणानंतरही वेगानं प्रगती होत असल्याचं सूचित केलं जात आहे.*

भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये (ग्रॉस डोमेस्टिक प्रोडक्ट: जीडीपी) ऑक्टोबर-डिसेंबर २०१६ या काळात सात टक्क्यांनी वाढ झाल्याचा अंदाज केंद्रीय सांख्यिकी कार्यालयानं (सेंट्रल स्टॅटिस्टिक्स ऑफिस: सीएसओ) दुसऱ्या आगाऊ अंदाजांमध्ये वर्तवला. निश्चलनीकरणाच्या परिणामांना सामोरं जात असलेल्या अर्थव्यवस्थेमध्ये हा अंदाज अपेक्षेपेक्षा खूपच जास्त होता. दुसऱ्या आगाऊ अंदाजामध्ये संपूर्ण वर्षाचे अंदाज समाविष्ट असतात, त्यानुसार २०१६-१७ वर्षासाठी जीडीपी वाढ ७.१ टक्के अपेक्षित आहे. पहिल्या आगाऊ अंदाजामध्ये हाच आकडा (२०१५-१६मधील ७.६ टक्क्यांपेक्षा अर्धा टक्क्याची घट दाखवणारा) वर्तवण्यात आला होता. आगाऊ व हंगामी अंदाज पुरवण्यासंदर्भातील एससीओची अनुमानपद्धती या अंदाजांनंतर पुन्हा प्रश्नांकित झाली आहे. ‘अर्थव्यवस्थेवर झालेला नोटबंदीचा परिणाम जोखायचा असेल तर’ अलीकडच्या अंदाजांवरून आपण ‘कोणतेही निष्कर्ष काढणार नाही’, अशी कबुली भारताचे मुख्य सांख्यिक टी. सी. ए. अनंत यांनीही दिली. तरीही, सरकारच्या काही प्रवक्त्यांनी उन्मादी प्रतिक्रिया देत असा दावा केला की, निश्चलनीकरणाचे विपरित परिणाम अतिशयोक्त करून वर्णिले जात आहेत आणि त्यांना काहीही आधार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अपेक्षेप्रमाणे प्रगतीविषयक ‘अनुमानं’ उत्तर प्रदेशातील निवडणुकीच्या भाषणांमध्ये वापरली.

सीएसओकडून देशाच्या अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसंदर्भातील दोन आकडेवाऱ्या घोषित केल्या जातात : बाजारपेठीय किमतींनुसार जीडीपी आणि पायाभूत किमतींनुसार सकल मूल्यवर्धन (ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड: जीव्हीए). हे दोन्ही आकडे वास्तविक स्वरूपात असतात. जीव्हीएमध्ये २०१६-१७ या वर्षामध्ये ६.७ टक्क्यांनी वाढ झाली; म्हणजे २०१५-१६पेक्षा १.१ टक्क्यांनी किंवा १.१५ लाख रुपयांनी यात घट झाली. निश्चलनीकरणानंतर अनौपचारिक क्षेत्रात आणि कौटुंबिक स्तरावर उत्पन्न, रोजगार व परिणामी क्रयशक्ती यांच्यात झालेली घट या आकडेवारीमध्ये स्पष्टपणे नोंदवली गेली आहे. पायाभूत किंमतींवरील जीव्हीएमध्ये अप्रत्यक्ष कर वगळलेले असतात. पूर्वी अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वास्तविक दर काढण्यासाठी उत्पादन घटक खर्चाच्या (फॅक्टर कॉस्ट) आधारे जीडीपीचा अंदाज बांधला जात असे, या पारंपरिक पद्धतीशी जीव्हीएचं साधर्म्य आहे. या आधीच्या पद्धतीची मुळे आर्थिक सिद्धान्तांमध्ये रुजलेली होती. नवीन पद्धतीनुसार जीडीपीचा अंदाज जास्त येतो, याचं कारण त्यामध्ये अप्रत्यक्ष कर समाविष्ट केलेले असतात. अधिकच्या करभरण्यामुळे वाढीव खर्च होऊ शकतो आणि त्यातून मूल्यवर्धन होऊ शकतं, त्यामुळे ही पद्धत दुहेरी मोजणीची आहे, असं म्हणता येईल.

पायाभूत किमतींसंबंधित जीव्हीएमध्ये ६.७ टक्क्यांनी झालेली वाढ शेती उत्पादनामधील बऱ्यापैकी सुधारणा आणि लोक प्रशासनावरील वाढीव खर्च यांमुळे झालेली आहे. सलग दोन वर्षांच्या दुष्काळानंतर शेती उत्पादनाचा दर गेल्या वर्षी ०.३ टक्के होता, तो वाढून ४.४ टक्के झाला; तर लोक प्रशासनावरील खर्च ६.९ टक्के होता, तो वाढून ११.२ टक्के झाला (इतर घटकांसोबतच सरकारी कर्मचाऱ्यांच्या वाढलेल्या वेतनामुळे हे घडलं). अप्रत्यक्ष करांच्या भरण्यात झालेली सुधारणा आणि संसदेत मंजूर झालेल्या दोन पूरक मागण्या यांमुळे महसूल खर्च वाढला. ही वार्षिक आकडेवारी आहे. २०१६-१७च्या तिसऱ्या तिमाहीसाठीच्या अंदाजांमध्येही शेती व सार्वजनिक खर्चातील वाढ चांगल्यापैकी सुधारली आहे.

परंतु बहुतांश क्षेत्रांमध्ये वार्षिक वाढीच्या दरांमध्ये मोठी घट झाल्याचं राष्ट्रीय उत्पन्नाच्या आगाऊ अंदाजांमध्ये दिसतं आहे. शेती व लोक-प्रशासन यांच्यासोबतच वीज या तीनही क्षेत्रांमध्ये मोठी वाढ झाली आहे. उरलेल्या पाच क्षेत्रांमध्ये मात्र वाढीचा दर प्रचंड खालावला : २०१५-१६ साली ९.८ टक्के असलेला हा दर २०१६-१७ साली ६.४ टक्क्यांवर आला. त्याचप्रमाणे २०१६-१७ च्या तिसऱ्या तिमाहीत ही वाढ ५.७ टक्के इतकी खाली आली. या पाच क्षेत्रांमध्ये वर्षभरापूर्वी १० टक्क्यांची वाढ झाल्याची नोंद करण्यात

आली होती. राष्ट्रीय उत्पन्नात झालेली ही घट म्हणजे निश्चलीकरणाचा थेट परिणाम आहे. (२०१६–१७मधील) तिसऱ्या तिमाहीतील पाच क्षेत्रांसाठीच्या जीव्हीए अंदाजांमध्ये आणि पूर्ण वर्षाच्या अंदाजांमध्ये उत्पादकीय व इतर बिगरवित्तीय क्षेत्रांमधील अनौपचारिक स्तराचाही समावेश आहे. या अनौपचारिक क्षेत्रांमध्ये २०११–१२ सालचे पायाभूत अंदाज प्रत्यक्ष श्रमपुरवठा पद्धतीवर अवलंबून होते, त्यांचा वापर करून पुढील सुधारीत अंदाज बांधण्यात आले. तर अगदी अलीकडच्या अंदाजांसाठी औपचारिक अर्थव्यवस्थेचे निर्देश वापरण्यात आले आहेत, ते साहजिकपणे अचूकतेच्या निकषावर कमी पडणार आहेत. निश्चलनीकरणाचा सर्वाधिक विपरित परिणाम स्वयंरोजगार करणाऱ्या आणि अनौपचारिक क्षेत्रातील लोकांवर झाला आहे, हे सर्व क्षेत्रीय अहवालांवरून स्पष्ट होतं, त्यामुळे हे विपरित परिणाम ताज्या आकडेवारीत आलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर सदर अंदाजात सूचित करण्यात आलं आहे त्यापेक्षा जीव्हीए अंदाजांमधील तोटा जास्त असणार आहे.

सीएसओनं केलेल्या त्यानंतरच्या अंदाजांवरून वृद्धी दरात घसरणच होते आहे, हे आता स्पष्ट झालं आहे. तिसऱ्या तिमाहीसाठीचा व २०१६–१७ या पूर्ण वर्षासाठीचा दुसरा आगाऊ अंदाज पुढील सुधारणांच्या फेऱ्यात आणखी खाली आलेला असेल, असं आधीच्या अनुभवांवरून म्हणता येतं. यामुळे भाजक कमी होऊन भविष्यकाळासाठीचा जीडीपी वृद्धी दर वाढेल. तिसऱ्या तिमाहीच्या अंदाजांवरही अशाच प्रकारचा परिणाम झाला आहे.

सीएसओच्या आगाऊ अंदाजांचा वापर करून सत्ताधाऱ्यांनी असा दावा केला आहे की निश्चलनीकरणानं अर्थव्यवस्थेला कोणतीही बाधा झालेली नाही. हे आकलन आगाऊ अंदाजांवर आधारलेलं असेल तर आगाऊ अंदाजांपासून ते अंतिम अंदाजांपर्यंत प्रत्येक टप्प्यावर अधिक विश्वासार्ह अंदाज बांधण्याचं आव्हान सांख्यिकी व्यवस्थेसमोर उभं राहातं. अंदाजबांधणीच्या सुरुवातीच्या टप्प्यावर अनौपचारिक क्षेत्रासाठी औपचारिक क्षेत्रातील माहिती गृहीत धरणं चुकीची दिशा दाखवणारे निकाल देऊ शकतं. त्या संदर्भात अधिक थेट संकेत गरजेचे आहेत. अनौपचारिक क्षेत्रातील पायाभूत अंदाजांना पुढं नेण्यासाठी किमान नमुन्यावर हे संकेत आधारलेले असू शकतात. २०१६–१७ या वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीतील निकालांनी आगाऊ अंदाजांच्या या अंगभूत मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. यातून अर्थव्यवस्थेचे निःपक्षपाती निरीक्षक बुचकळ्यात पडले आहेत आणि विद्यमान सरकारच्या हानिकारक व विस्कळीत आर्थिक धोरणांच्या समर्थनाची सोय या अंदाजांनी करून दिली आहे.

सीएसओच्या अंदाजांमध्ये सुधारणा केल्या जात नाहीत तोपर्यंत सरकारला त्याचा लपवाछपवीसाठी उपयोग होत राहील, पण प्रत्यक्षात शंकेचं वातावरण वाढत जाईल. ●

---

## आधाराची सक्ती!

*कल्याणकारी राज्यसंस्था व टेहळणी करणारी राज्यसंस्था यांच्यातील सीमारेषा वेगानं पुसट होते आहे.*

अन्नाधिकारांच्या उपलब्धततेसाठी अटी ठेवणं, हे कल्याणकारी राज्यसंस्थेचं वैशिष्ट्य नाही. मध्यान्ह आहार योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठी 'आधार' क्रमांक अनिवार्य बनवणारी अधिसूचना सरकारनं अलीकडेच काढली आणि त्याला साहजिकपणे निषेधाला सामोरं जावं लागलं. काही राज्यांमध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी 'आधार' नोंदणी अनिवार्य करण्यात आल्यावर मोठा गहजब उडाला, तो अजून शांत झाला नसताना सरकारनं यासंबंधी नवीन अधिसूचना काढणं आश्चर्याचंच म्हणावं लागेल. 'आधार' नोंदणी व प्रमाणीकरणाशी संबंधित समस्या आणि त्याबरोबरीनं तंत्रज्ञान व पायाभूत–रचना यांविषयीच्या अपुरेपणामुळे प्रामाणिक लाभार्थींनाही वगळलं जातं असल्याचं गुजरात, झारखंड, आंध्रप्रदेश व इतर राज्यांमध्ये अनुभवास आलेलं आहे. केवळ 'तंत्रज्ञान' आत्मसात केल्यामुळे भ्रष्टाचार व सेवापुरवठ्यातील अकार्यक्षमता यांच्यावर उपाय होईल असं मानता येणार नाही, हे या अनुभवांमधून सरकारच्या लक्षात यायला हवं होतं. किंबहुना, अशा अपुऱ्या अंमलबजावणीमुळे सामाजिक–आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक धोकाग्रस्त असलेल्या लोकांना वगळलं जातं.

तरीही गेल्या काही आठवड्यांमध्ये विविध मंत्रालयांनी

अधिसूचना काढून तीसहून अधिक योजनांना 'आधार'च्या कक्षेत आणण्याचे आदेश दिले आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, निवृत्तीवेतन व शिष्यवृत्ती अशा विविध योजनांचा यात समावेश आहे. अलीकडे तर, १९८४च्या भोपाळ वायुगळती प्रकरणातील पीडितांना दिल्या जाणाऱ्या नुकसानभरपाईसाठीही 'आधार' नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. थेट लाभ हस्तांतरण कार्यक्रमाअंतर्गत येणाऱ्या सर्व ८४ योजनांसाठी 'आधार' अनिवार्य करणं, हे यामागील ध्येय आहे.

सरकार मान्य करत नसलं तरी या अधिसूचना सर्वोच्च न्यायालयाच्या विविध आदेशांचा भंग करणाऱ्या आहेत. लोकांच्या हक्काचे सरकारी लाभ मिळवण्यासाठी 'आधार' अनिवार्य करता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं वारंवार स्पष्ट केलं आहे. हे प्रकरण अजूनही न्यायप्रविष्ट आहे. सरकारनं हा विषय टाळत अलीकडेच प्रसिद्ध केलेल्या वृत्तपत्रकात म्हटलं होतं की, 'एखाद्या व्यक्तीला आधार क्रमांक मिळत नाही तोपर्यंत, तिला ओळखीच्या पर्यायी साधनांच्या आधारे लाभ दिला जात राहील.' हे लाभ वा अधिकार उपलब्ध करून घेण्यासाठी 'आधार' क्रमांक गरजेचा आहे, आणि तो नसल्यास इतर निर्धारित ओळखपत्रं स्वीकारली जातील, असं अलीकडच्या सर्व अधिसूचनांमध्ये म्हटलेलं आहे. परंतु लाभार्थींना 'आधार' नोंदणीसाठी अर्ज केल्याचा पुरावाही सादर करावा लागेल. हा पुरावा देण्यासाठी ठरवण्यात आलेला काटेकोर कालावधी पाहाता 'आधार' असणं व्यवहारात अनिवार्यच आहे, हे स्पष्ट होतं.

गळतीची समस्या दूर करून पारदर्शकता आणणारं आणि बनावट लाभार्थींना वगळल्यामुळे 'जनतेचा प्रचंड पैसा' वाचवणारं हे चमत्कारी औषध आहे, अशा प्रकारे सरकार आधारप्रणालीचं समर्थन करतं आहे. परंतु आधार योजनेमध्ये प्रचंड माहिती साठवून नियंत्रित केली जाणार आहे, त्यातून 'माहिती-टेहळणी' (वैयक्तिक तपशील किंवा आंतरजालीय व्यवहारांशी संबंधित डिजिटल माहितीचं नियंत्रण करणारी पद्धती) शक्य होणार आहे, हे सरकार सांगत नाही. आधारप्रणालीची संकल्पना पहिल्यांदा भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं मांडली. कारगील युद्धानंतर सुरक्षा व टेहळणीचा प्रकल्प म्हणून ही योजना असल्याचं सांगण्यात आलं. सध्याच्या 'आधार'चं स्वरूपही तसंच आहे. शिवाय, खाजगीपण जपण्यासाठीचा कायदा किंवा जीवसांख्यिकी माहितीच्या नियमनासंबंधीचा कायदा न करताच ही योजना अंमलात आणून सरकारनं घटनात्मक प्रक्रिया व संरक्षणकवचांनाही टाळलं आहे. 'आधार (वित्तीय आणि इतर अनुदान, लाभ व सेवांचा लक्ष्यकेंद्री पुरवठा) अधिनियम, २०१६' हा कायदा आर्थिक विधेयक म्हणून मंजूर करून सरकारनं अशीच मूळ मुद्द्याला बगल दिली. 'आधार' अनिवार्य करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेशही यात धुडकावण्यात आले.

आपली जीवसांख्यिकी माहिती नियंत्रित करण्याचं काम 'आधार'द्वारे होऊ शकतं, ही सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीनं सर्वांत चिंताजनक बाब आहे. 'आधार' नोंदणी अर्जामधील एका जागेत ढोबळपणे 'संमती'ची विचारणा करण्यात आली आहे: 'यूआयडीएआय (युनिक आयडेन्टिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया) या संस्थेला मी दिलेली माहिती यूआयडीएआयनं कल्याणकारी सेवांसह सार्वजनिक सेवा पुरवणाऱ्या संस्थांना दिल्यास माझी त्याला हरकत नाही'. भविष्यातील सोयीच्या दृष्टीनं संमती द्यावी, असं नोंदणी केंद्रांमधील कर्मचारी लोकांना सुचवतात, पण यासंबंधीचे नियम यूआयडीएआयनं स्पष्टपणे निश्चित केलेले नाहीत. 'आधार'चा प्रसार करताना सरकारनं या संमतीच्या मुद्द्याला अधोरेखित केलेलं नाही अथवा त्याचं स्पष्टीकरणही केलेलं नाही. शिवाय, नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर एकवेळचा परवली संकेत (वन टाइम पासवर्ड: ओटीपी) मिळवून यूआयडीएआयच्या संकेतस्थळावरील एखाद्या व्यक्तीची जीवसांख्यिकी माहिती लॉक करण्याचा (ही माहिती आपोआप अनलॉक होते) मार्गही अस्तित्त्वात आहे, ही वस्तुस्थिती नागरिकांपर्यंत पोचवली जात नाही. हा मुद्दा अधोरेखित करण्यात आलेला नाही आणि इंटरनेट वा मोबाइल फोन न वापरणाऱ्यांना हा मार्ग अवलंबताही येत नाही.

'आधार अधिनियमा'मध्ये या मुद्द्यांची दखलही घेण्यात आलेली नाही. उलट गोंधळात भर टाकत या अधिनियमातील कलम ५७मध्ये म्हटलं आहे की: 'कोणत्याही कारणासाठी राज्यसंस्थेकडून वा कोणत्याही कॉर्पोरेट संस्थेकडून वा व्यक्तीकडून एखाद्या व्यक्तीची ओळख कायदेशीररीत्या प्रस्थापित करण्यासाठी आधार क्रमांकाचा वापर करण्याला

अधिनियमातील कोणत्याही मुद्द्यामुळे प्रतिबंध होऊ नये.' आधार प्रमाणीकरणाचा व संबंधित माहितीचा वापर सरकारबाह्य संस्थाही करू शकतात, हे या कलमावरून स्पष्ट होतं, आणि असा वापर झालेलाही आहे. अलीकडेच लोकांकडून तक्रारी आल्यानंतर यूआयडीएआयनं २४ कंपन्यांना अनधिकृतरीत्या आधारप्रणालीमधील माहिती वापरण्यापासून थांबवलं. या अधिनियमात 'जीवसांख्यिकी माहिती'ची व्याख्याही ढोबळ स्वरूपाची आहे, त्यात भविष्यात 'इतर जैविक घटकां'चा (डीएनए) समावेश करण्याची शक्यताही सूचित केलेली आहे, यामुळे गोंधळात भरच पडते. याचबरोबर एकीकडे 'आधार' अनिवार्य करू नये असा आदेश देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयानं फेब्रुवारी २०१७ मध्ये स्वतःच्याच आदेशांना छेद देणारा नवा आदेश दिला, त्यानुसार सर्व मोबाइलमधील सिमकार्डं 'आधार' क्रमांकांशी जोडणं बंधनकारक करण्यात आलं. केवळ लोकसांख्यिकी स्वरूपाची नव्हे तर जीवसांख्यिकी स्वरूपाचीही इतकी प्रचंड माहिती नियंत्रित करण्यासंबंधी व ती उपलब्ध करून घेण्याच्या मार्गांसंबंधी अनेक गंभीर प्रश्न या घडामोडींमधून उपस्थित होतात.

'आधार'चं समर्थन करताना भारतीय राज्यसंस्था एखाद्या कॉर्पोरेट संस्थेसारखी वागत आहे. आपली माहिती मिळण्याच्या अटीवरच सेवा दिल्या जातील आणि आपल्याला टेहळणीखाली ठेवण्याचे अधिकार सेवादात्याला मिळतील, अशी ही परिस्थिती आहे. लोकांकडून पारदर्शकतेची अपेक्षा करणारी राज्यसंस्था स्वतः मात्र पारदर्शक होण्यासाठी काहीच प्रयत्न करत नाहीये, हे यातून स्पष्ट होतं. ●

---

## क्रांतीच्या सुईणी?

*'सोव्हिएत' संघाचं आणि परिवर्तनासाठी मोर्चा काढलेल्या स्त्रियांचं काय झालं?*

रशियातील पेट्रोग्राड इथं ८ मार्च १९१७ रोजी स्त्रियांनी केलेल्या संपातून रशियन क्रांतीचा आरंभ झाला, याची जाणीव मोजक्याच लोकांना आहे. १९१७ सालच्या दोन रशियन क्रांत्यांच्या आरंभांची शताब्दी साजरी करताना 'ऑक्टोबर क्रांती'ला (पाश्चात्त्य ज्युलियन दिनदर्शिकेनुसार नोव्हेंबर) निःसंशयपणे अधिक मानाचं स्थान मिळेल, कारण विसाव्या शतकातील सर्वाधिक प्रभावी राजकीय घटनांमध्ये या घटनेला विवाद्यरीत्या गणता येतं. फेब्रुवारीमध्ये (पाश्चात्त्य ज्युलियन दिनदर्शिकेनुसार मार्चमधे) राजेशाहीच्या क्रूर सत्ताकाळाचा अंत कामगारांनी व सैनिकांनी (सैनिकांमध्ये बहुतांश गणवेशधारी शेतकरीच होते) केला तेव्हा भांडवलशाहीला विरोध करण्याचा त्यांचा हेतू नव्हता. किंबहुना भांडवलशहा व उमरावांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या कडेट पार्टीला हंगामी सरकार स्थापन करण्याची मुभाही या कामगार-सैनिकांनी दिली.

पहिल्या महायुद्धाच्या काळादरम्यान-१९१७च्या हिवाळ्यामध्ये सर्वसामान्य लोकांसाठी परिस्थिती असह्य बनली होती. अन्न व इंधनाचा तीव्र तुटवडा निर्माण झाला होता, त्यामुळे कामगार आणि त्यांची कुटुंबं गरीबीत ढकलली जात होती. १९०५ सालच्या अपयशी क्रांतीचा आरंभ ठरलेला 'रक्तरंजित रविवार' स्मरणात ठेवत पेट्रोग्राडमध्ये संप करण्यात आले व निषेधमोर्चेही निघाले. पेत्रोलोव वर्क्स या कारखान्यातील टाळेबंदीनं जनक्षोभात भरच टाकली. त्यानंतर २३ फेब्रुवारीला (पाश्चात्त्य ज्युलियन दिनदर्शिकेनुसार ८ मार्चला- आंतरराष्ट्रीय महिला दिन) पेट्रोग्राडच्या रस्त्यांवर उतरून कापडोद्योगातील महिला कामगारांनी अन्नाची मागणी केली, यातून पुढील घटनाक्रमाला वेग मिळाला. व्योबर्ग जिल्ह्यातील धातूउद्योगामध्ये गुंतलेल्या कामगारांचं नेतृत्व बोल्शेविक करत होते आणि हे कामगार सर्वाधिक परिवर्तनवादी मानले जात होते, पण महिला कामगारांनी धैर्य व निर्धारानं सुरू केलेल्या आंदोलनात व्योबर्गमधील कामगारांना अक्षरशः खेचून सामील करून घ्यावं लागलं. या पार्श्वभूमीवर ८ मार्च हा 'फेब्रुवारी क्रांती'चा पहिला दिवस ठरेल अशी कल्पना कोणीच केली नव्हती.

या महिला कामगारांनी 'फेब्रुवारी क्रांती'साठी सुईणीचं काम केलं, असं म्हणणं अतिशयोक्तीचं वाटू शकतं, पण त्यांच्याच कृतीमुळे दिवसाअखेरीला सुमारे ९० हजार कामगार

रस्त्यावर उतरले होते, त्यातूनच पुढील घटनांना गती मिळाली. दुसऱ्या दिवशी रस्त्यावर उतरणाऱ्या लोकांची संख्या वाढली. अन्नाच्या मागणीला राजकीयदृष्ट्या अधिक थेट घोषणांची जोड मिळाली: 'एकसत्ताकशाही बंद करा', 'युद्धखोरी बंद करा', अशा घोषणा सुरू झाल्या. या वेळी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तैनात असलेल्या सैनिकांना सामोरं जाण्याचं धैर्य महिला कामगारांनी दाखवलं. 'कॉम्रेडांनो, तुमच्या संगिनी खाली करा आणि आमच्यासोबत चला!' असं आवाहन त्यांनी सैनिकांना केलं. अनेक सैनिक शेतीची पार्श्वभूमी असलेलेच होते, त्यांनी या आवाहनाला प्रतिसाद दिला आणि ते निदर्शकांसोबत मोकळेपणानं मिसळू लागले. २६ जानेवारीच्या (पाश्चात्त्य ज्युलियन दिनदर्शिकेनुसार ११ मार्च) दरम्यान बंड सुरू झालं. लोक जिंकत असल्याचं दिसत असेल तरच सर्वसाधारणपणे सैनिक बंड करतात, आणि लोकांमध्ये सामील होतात. या घडामोडींमध्ये महिला कामगारांनी मोलाची भूमिका पार पाडली.

हे बंड १२ मार्चपर्यंत पूर्ण झालं आणि झारशाहीला खाली खेचण्यात आलं. या उठावाचा विजय झाल्यावर विचारसरणीची सत्ता (म्हणजे भ्रामक जाणीव) अतिशय बलवान होती. झारच्या सत्तेची जागा बूर्झ्वा सत्ता घेईल, असं दिसत होतं! परंतु समांतरपणे कामगारांचे संघ (सोव्हिएत) व सैनिकांच्या समित्या तयार झाल्या होत्या. फेब्रुवारी क्रांतीच्या काळात कामगारांनी व सैनिकांनी या नियुक्त मंडळांची निर्मिती केली होती. त्यामुळे पर्यायी सत्ताकेंद्र अस्तित्त्वात आलं. पण कडेट पार्टीच्या नेत्यांच्या प्रभुत्वाखालील हंगामी सरकारनं क्रांतीच्या मागण्या पूर्ण होण्यामध्ये अडथळा निर्माण केला.

हे नवीन सरकार किंवा दुसरं कोणतंही बूर्झ्वा सरकार आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी इच्छुक नसेल, हे कामगारांना, सैनिकांना (गणवेशधारी शेतकरी) आणि शेतकऱ्यांना लगेचच लक्षात आलं. लोकशाही प्रजासत्ताक स्थापावं, ग्रामीण उमरावांच्या जमिनी ताब्यात घेऊन शेतकऱ्यांमध्ये त्यांचं मुक्त वाटप करावं, महायुद्धातील रशियाचे साम्राज्यवादी हेतू सोडून द्यावेत, शांततेच्या बाजूनं उभं राहावं आणि कामाचा दिवस आठ तासांचा करावा– अशा मागण्या या वेळी करण्यात आल्या होत्या. हंगामी सरकार हे 'आपलं' सरकार आहे, असं मानणं जीवघेणं ठरल्याची जाणीव वाढत होती, त्याचसोबत भांडवलशहांच्या टाळेबंदीच्या सहाय्यानं प्रतिक्रांतिकारी सैनिकी बंडाचा धोकाही वाढला होता. या पार्श्वभूमीवर आपल्या मागण्या पूर्ण व्हायच्या असतील तर हे सरकार उलथवून टाकून सोव्हिएत सरकार स्थापन करणं गरजेचं आहे, हे कामगार, सैनिक व शेतकऱ्यांच्या लक्षात येत केलं.

सोव्हिएतांच्या सरकारनं ऑक्टोबरमध्ये (नोव्हेंबर) सत्ता हाती घेतली, पण झारशाहीला उलथवण्यात महत्त्वाचा सहभाग घेतलेल्या महिला कामगार विस्मृतीत गेल्या आणि त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांनी हंगामी सरकारला उलथवण्यात पुढाकार घेतला. परंतु स्वतंत्र स्वराज्य संस्था म्हणून सोव्हिएतांचं अस्तित्त्व १९१८ सालच्या उन्हाळ्यानंतर टिकू शकलं नाही. या पार्श्वभूमीवर, क्रांतीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या महिलांसोबतच रशियन कष्टकरी वर्गाला सोव्हिएत संघांमध्ये व कारखान्यांमध्ये सत्तेपासून वंचित राहावं लागलं, हा दुर्विलास ठरतो.

मानवतेसाठी निःस्वार्थीपणे त्याग करणाऱ्या सर्वसामान्य माणसांची व त्यांनी निर्माण केलेल्या मानवी संस्थांची उच्चभ्रूंकडून फसवणूक होणं, हा कायमचा नियमच आहे की काय? ●

अनु. : **प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीची संपादकीये अनुवादित करण्यासाठी *द एच. टी. पारेख फाउंडेशन*चे साहाय्य लाभले आहे.

(११ व १८ मार्चच्या अंकातून)

**अंकाच्या वितरण आणि वर्गणी संदर्भात फक्त**

**प्रशांत खुंटे**

**यांच्या खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.**

**९७६४४३२३२८**